## संक्षिप्त

### जैवइंधन दिवस कार्यक्रमाला ८ शेतकऱ्यांची उपस्थिती

**सातारा :** भारतात २०१५ पासून जागतिक जैवइंधन दिवस साजरा केला जातो. यंदाही दिल्ली येथील विज्ञान भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच जैवइंधन दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने केंद्र सरकारच्या पेट्रोलियम मंत्रालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय परिषदेत यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे ८ ऊस उत्पादक शेतकरी व २ अधिकारी अशा एकूण १० जणांनी सहभाग घेतला. या वेळी व्यासपीठावर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, खाद्यमंत्री रामविलास पासवान, कृषिमंत्री राधामोहन सिंह, विज्ञानमंत्री डॉ. हर्षवर्धन, पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान आदी मान्यवर उपस्थित होते.

### कर्नाटकातील शेतकऱ्यांची नारायणगाव बाजारास भेट

**नारायणगाव, जि. पुणे :** कर्नाटकातील कडूर तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व प्रगतशील शेतकऱ्यांनी जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव येथील टोमॅटो उपबाजाराला भेट दिली. खुल्या पद्धतीने सुरू असलेल्या टोमॅटो बाजाराची माहिती त्यांनी घेतली. टोमॅटो बाजारपेठेची व व्यापाराची माहिती घेण्यासाठी कडूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व नव्वद शेतकरी जुन्नर येथे गुरुवारी (ता. २२) आले होते. बाजार समितीचे उपसभापती दिलीप डुंबरे, संचालक एन. एम. काळे यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी ग्रीन इनोव्हेशन केंद्राचे धनंजय बाबू, संजीव राठोड, नारायणगाव टोमॅटो उपबाजाराचे कार्यालयीन प्रमुख शरद घोंगडे, टोमॅटो व्यापारी सारंग घोलप उपस्थित होते.

# पुणे जिल्ह्यात धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस

## वडीवळे धरण क्षेत्रात सर्वाधिक पाऊस; पाणीपातळी वाढल्याने १३ धरणे ओव्हरफ्लो

**पुणे (प्रतिनिधी) :** धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम असून अनेक भागात पावसाची संततधार सुरू होती. गुरुवारी (ता. २२) सकाळी आठ वाजेपर्यंत वडीवळे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सर्वाधिक ५६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे ओढे, नाले खळाळून वाहत असून धरणातील पाणीपातळीत चांगलीच वाढ झाली आहे.



पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेकडील मावळ, मुळशी, भोर, वेल्हा, हवेली आणि उत्तरेकडील खेड, आंबेगाव, जुन्नर तालुक्यांत दिवसभर भागात पावसाची संततधार सुरू होती. पश्चिमेकडील मावळ, मुळशी, भोर, वेल्हा तालुक्यांत पावसाने दमदार हजेरी लावली. भोर तालुक्यातील भोळावडे येथे सर्वाधिक ६८ मिलिमीटर पाऊस पडल्याची नोंद झाली. पूर्वेकडील तालुक्यात पावसाच्या अधूनमधून सरी बरसत होत्या. त्यामुळे खरिपातील पिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

गेल्या आठवड्यापासून पुणे जिल्ह्यातील बहुतांशी भागात ढगाळ हवामान आहे. चार ते पाच दिवसांपासून पश्चिमेकडील मावळ, मुळशी, भोर, वेल्हा तालुक्यांत सकाळपासून संततधार चालू आहे. त्यामुळे भात पिकांना चांगलाच दिलासा मिळत असून काही ठिकाणी भात लागवडी अंतिम टप्प्यात आल्या असून अनेक ठिकाणी भाताची वाढही जोमदार आहे. वडीवळे धरणाच्या पाणलोट क्षेत्रानंतर नीरा देवधर आणि टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ५१ मिलिमीटर पाऊस पडला.

पानशेत ४३, मुळशी ३८, पवना ४०, वरसगाव ३८, गुंजवणी ३६, पिंपळगाव १७, भाटघर १७, कळमोडी १५, खडकवासला १४, आंध्रा १३, माणिकडोह, डिंभे १२, भामाआसखेड १०, कासारसाई १०, घोड पाच, चासकमान तीन, वीर, नाझरे, येडगाव, वडज धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दोन मिलिमीटर पाऊस पडला. त्यामुळे नीरा देवधर, भाटघर, वीर, कळमोडी, चासकमान, भामाआसखेड, वडीवळे, आंध्रा, पवना, मुळशी, वरसगाव, पानशेत, खडकवासला ही धरणे शंभर टक्के भरली असून उर्वरित टेमघर, कासारसाई, पिंपळगाव जोगे, माणिकडोह, येडगाव, वडज, डिंभे, घोड, विसापूर या धरणांतील पाणी पातळीत वाढ होऊ लागली आहे. या भागात पावसाची अशीच स्थिती आठ दिवस राहिल्यास ही धरणे भरण्याची शक्यता आहे.

# नगर जिल्ह्यामध्ये पुन्हा पाऊस गायब

## जिल्ह्यामध्ये तेरा तालुक्यांत जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम

**नगर (प्रतिनिधी) :** नगर जिल्ह्यामध्ये दोन दिवस पावसाची रिपरिप सुरू होती. त्यानंतर कालपासून (बुधवार) पाऊस गायब झाला आहे. दोन दिवसभर आभाळ भरून आलेले, सर्वत्र अंधारून आलेले; पण मोठा पाऊस काही पडेना, अशी स्थिती होती. मात्र, पावसाळ्यातील सव्वा दोन महिन्यांनंतरही अकोले तालुका वगळता अन्य तेरा तालुक्यांत जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. अकोल्यात मात्र पाऊस सुरू आहे.

पावसाळ्याचे आता दोन महिने उलटून गेले आहेत. मध्यंतरी दीड महिन्यांपासून गायब झालेल्या पाऊस दोन दिवसांपूर्वी परतला. दोन दिवस पूर्णतः ढगाळ वातावरण होते आणि पावसाची रिपरिप सुरू होती. मुर पावसामुळे खरिपातील पिकांना जीवदान मिळाले आहे. आता पुन्हा पाऊस गायब झाला आहे. दोन दिवसांच्या पावसातही कोणत्याही तालुक्यात जोरदार पाऊस झाला नाही. त्यामुळे अकोले तालुक्यातील भंडारदरा, निळवंडे वगळता अन्य कोणत्याही प्रकल्पात पाणीसाठा वाढला नाही. अकोल्यातील पावसामुळेच मुळात पाण्याची आवक सुरू आहे. दोन दिवसांच्या पावसाने खरिपाला जीवदान मिळाले असले तरी पाणीसाठा वाढला नसल्याने पिण्याच्या पाण्याचे संकट उद्भवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अकोले तालुक्यात मात्र पाऊस सुरू आहे. मुळा धरणाच्या पाणलोटात पाऊस सुरू असल्याने मुळात पाण्याची ६५९२ क्युसेकने आवक सुरू आहे. भंडारदरातून २ हजार ३७ क्युसेकने, निळवंडेमधून प्रवरा नदीत ७ हजार २९०, नांदुर मधमेश्वर मधून १२ हजार ६२० क्युसेक गोदावरी नदीतच विसर्ग सुरू आहे. आज (गुरुवारी) सकाळी सहा वाजेपर्यंत झालेला पाऊस असा : भंडारदरा : ५९, वाकी : ४५, पांजरे :७४, रतनवाडी : १४८, घाटघर : ९२, निळवंडे : ६, अकोले : ६, आढळा : २, कोतूळ : ६.

# कृषी दिनानिमित्त शेतकरी मेळावे घेण्याच्या सूचना

**पुणे (प्रतिनिधी) :** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतकऱ्यांकरिता केलेल्या कार्याचे स्मरण व्हावे, म्हणून २५ ऑगस्ट हा त्यांचा जन्म दिवस शेतकरी दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. यंदाही या शेतकरी दिनानिमित्त कृषी विभागाने उन्नत शेती समृद्ध शेतकरी कार्यक्रमाअंतर्गत प्रक्षेत्रावर शेतकरी मेळावे घेण्याच्या सूचना सहसचिव अशोक आत्राम यांनी दिल्या आहेत.

दरवर्षी हा दिवस तिथीप्रमाणे शेतकरी म्हणून साजरा करण्यात येतो. यंदाही कृषी विभागाने हा शेतकरी दिन राज्यभर मेळाव्याचे कार्यक्रम घेऊन साजरा करावा. या दिवशी शेतकऱ्यांना ग्रामसभा व अन्य कार्यक्रमाच्या माध्यमातून तांत्रिक मार्गदर्शन व साह्य देण्यात यावे. या दिवशी कृषी सहायक, कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्रांशी संबंधित तज्ज्ञांनी इतर शेतकऱ्यांना उन्नत शेतीपासून कशाप्रकारे उत्तम शेती होऊ शकते हे दाखवावे. तसेच, शक्य असल्यास कृषी संयंत्र व औजारे यांचे वितरण करण्यासाठी पूर्वसंमती देण्याची कार्यवाही पूर्ण करून अनुदान वाटपाची सुरवात करावी. पीक संरक्षणाच्या दृष्टीने प्रभावशाली उपाययोजना करण्यासाठी क्रॉपसॅप कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या कृषी कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर जाऊन संवाद करावा.

सकाळ ॲग्रोवन — आयोजित
Biofit — नेटसर्फ कम्युनिकेशन्स प्रा. लि. — प्रायोजित
सकाळ ॲग्रोवन संवाद
'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
शनिवार, २५ ऑगस्ट २०१८ रोजी
विषय – ऊस व आले पीक परिसंवाद
वक्ते – श्री. अंकुश सोनावले
(कृषी सहायक, नागठाणे, ता. जि. सातारा)
स्थळ – कामगार भवन हॉल, सातारा रोड, ता. कोरेगाव, जि. सातारा
वेळ – सायं. ५ वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# सातारा जिल्ह्यातील सहा धरणांतून विसर्ग कायम

**सातारा (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील कोयना, धोम, उरमोडी, कण्हेर, तारळी व धोम-बलकवडी या सहा प्रमुख धरणांतून सलग दुसऱ्या दिवशी धरणातून विसर्ग कायम ठेवण्यात आला. कोयना धरण क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने विसर्गात वाढ करण्यात आली आहे.

वीजनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या कोयना धरण क्षेत्रात पावसाचा जोर वाढला आहे. यामुळे बुधवारी (ता. २२) सायंकाळी सात वाजता धरणाचे सहा वक्र दरवाजे पाच फुटावरून साडे सहा फुटावर उचलण्यात आले आहेत. या सहा दरवाज्यांतून ५५ हजार २७७ व पायथा वीज गृहातून २१०० असा एकूण ५७ हजार ३७७ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. यामुळे मुळगाव येथील पूल तिसऱ्यांदा पाण्याखाली गेला आहे. धरण क्षेत्रातील कोयना ८०, नवजा १४१, महाबळेश्वर १०६ मिलिमीटर पाऊस झाला आहे. या धरणात १०२.५४ टीएमसी पाणीसाठा झाला आहे.



धोम, उरमोडी, कण्हेर, तारळी व धोम-बलकवडी या पाच धरणांतून पावसाचा विसर्ग कायम असून धोम आणि उरमोडी धरणांतून पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. सध्या धोम ६,२८६, कण्हेर २,८३७, उरमोडी १,५९०, धोम-बलकवडी ३,०५४, तारळी १,८४० क्युसेक पाण्याचा विसर्ग केला जात आहे.

### पावसाचा जोर कमी झाला

जिल्ह्यात मंगळवारच्या तुलनेत बुधवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला आहे. जिल्ह्यात गुरुवारी (ता. २३) सकाळी आठपर्यंत सरासरीस १३.८३ मिलिमीटर पाऊस झाला आहे. पश्चिमेकडील महाबळेश्वर, जावली, पाटण, सातारा या तालुक्यांत काही ठिकाणी पावसाच्या दमदार सरी झाल्या आहेत. कराड, वाई, खंडाळा, कोरेगाव, खटाव या तालुक्यांत तुरळक पाऊस झाला आहे. माण, फलटण या दुष्काळी तालुक्यांत पावसाची दडी कायम आहे. पश्चिमेकडील तालुक्यात संततधार पावसामुळे पिकांत मोठ्या प्रमाणात तण आले आहे. मात्र, दुष्काळी तालुक्यात पावसाअभावी पिके धोक्यात येऊ लागली आहेत.